Rotary 2020-2021

# southern star ...अवघे धरू सुपंथ

*The official bulletin of Rotary Club of Pune South* *Year : 51, Vol : 6, December 2020*

**EVERYONE HAS TWO EYES... BUT NO ONE HAS THE SAME VIEW...**

**President :** Rtn. Sudarshan Natu | **Secretary :** Rtn. Manisha Belgaonkar | **Editor :** Rtn. Yogesh Nandurkar

## December - Disease Prevention and Treatment Month

Rtn. Abhijit Deshpande (AB)

Friends, are you aware that amongst the world population, only one in six people can afford to pay for healthcare? Rotary believes that good healthcare is everyone's' right. Therefore, Rotary initiatives worldwide are focused on bringing healthcare to the farthest and remotest corners of the world. Rotary volunteers work with zeal and goodwill that helps to bring a smile back to millions of faces worldwide.

Although eradication of polio is a focus area for us, initiatives for preventing and fighting against diseases like Malaria and HIV have also been taken up in large numbers by clubs around the world. Rotary partners with government and private institutions and aims at building infrastructure, providing training to doctors, nurses and paramedical staff and also endeavours at education and awareness about health among the masses.

'Prevention is better than cure.' - Friends, the COVID-19 pandemic has proven this like nothing else. In the daily life of communities around the world, simple things like clean water and clean surroundings - things that we take for granted, go a long way in ensuring their survival. Donations to Rotary, CSR Projects and Global Grants go a long way in ensuring that these basic necessities are met so that the future is healthier.

**$65 million grant was given by Rotary to fight disease.**

**99.9% reduction in polio cases since the program started in 1985**

**Rotary makes amazing things happen, like:**

- *Providing clean water: Rotary has worked with partners to provide with clean water to more than 80% of Ghana's people to fight against Guinea worm disease.*
- *Reducing HIV Infection: In Liberia, Rotary members are helping women get tested for HIV early in their pregnancies. They used prenatal care to reduce new HIV infections in children by 95% over two years.*
- *Ending Polio: Rotary members have played a key role in bringing the world to the brink of polio eradication. Their efforts have not only ended polio in 122 countries but also created a system for tackling myriad other health priorities, such as Ebola*


Let us pledge to contribute to this important Rotary initiative and make the world a healthier place.

Click here to watch...

## समृद्धीकरता सहकार शेती

रो. योगेंद्र नातू

ऐकण्यासाठी क्लीक करा...




रोटरी न्यूजचा नोव्हेंबर महिन्याचा अंक बघितला. पपयांनी लगडलेल्या झाडाच्या बुंध्याशी मयांक गांधी बसले आहेत असं चित्र असलेलं मुखपृष्ठ इतकं आकर्षक आहे की, त्याबद्दलची गोष्ट वाचल्याशिवाय अंक खाली ठेववतच नाही.

मयांक गांधी हे अण्णा हजारे यांच्याबरोबर भ्रष्टाचारविरोधी चळवळीत अग्रभागी होते... ते आम आदमी पार्टीतही होते. २०१५ साली राजकारणातला फोलपणा लक्षात आल्यामुळं ते राजकारणातून बाहेर पडले. २०१६च्या उन्हाळ्यात त्यांनी सामाजिक सेवेसाठी स्वतःला वाहून घ्यायचं ठरवलं. देशामध्ये जर काही बदल घडवून आणायचा असेल तर देशामधली खेडी समृद्ध करायला हवीत हे त्यांना जाणवलं.

याकरता कुठल्या खेड्यांमध्ये काम करावं असा प्रश्न त्यांना पडला... तेव्हा त्यांच्या लक्षात आलं की, आत्महत्या करत असलेल्या शेतकऱ्यांची संख्या मराठवाडा प्रांतात खूप जास्त आहे... त्यातही दुष्काळग्रस्त असा बीड जिल्हा अग्रभागी आहे... म्हणूनच मग परळीजवळच्या पंधरा खेड्यांमध्ये काम करायचं त्यांनी ठरवलं. याबाबतीत त्यांचं म्हणणं असं 'या खेड्यांमध्ये राहायचं तर ते इतकं कष्टाचं आणि इतकं कठीण आहे की, मी जर इथला शेतकरी असतो तर आत्तापर्यंत मला दहा हार्ट ॲटॅक येऊन गेले असते.'

तिथं काम करताना एक लक्षात येतं की, बाहेरून आलेला हा माणूस का आणि कशाकरता इथं आलाय अशाच शंका सर्वप्रथम स्थानिकांच्या मनात येतात... त्यामुळं कुठून आणि कशी सुरुवात करायची हाच मोठा प्रश्न असतो. त्याकरता त्या ठिकाणच्या अत्यंत जिव्हाळ्याच्या 'पाणीप्रश्नालाच' त्यांनी हात घातला. या भागातल्या पापनाशी नदीचा सखोल अभ्यास केला. खूप काटेकोर नियोजन, पैसे आणि श्रम यांचा वापर करून या नदीचा जवळजवळ सत्तर किलोमीटर लांबीचा भाग त्यांनी पुनरुज्जीवित केला. त्याचबरोबर श्रमदानातून एकशे बासष्ट तळी बांधली आणि पाच छोटी धरणंसुद्धा.

हळूहळू इथल्या उजाड माळरानांचं रंगरूप पालटायला लागलं. ती हिरवी दिसायला लागली... जमिनीतली पाण्याची पातळी तीनशे फुटांऐवजी पन्नास फुटांपर्यंत आली. पहिल्या वर्षी आंबा, सीताफळ, पपई, मोसंबी, शेवगा आणि केळी अशा झाडांची जवळजवळ बारा लाख रोपं त्यांनी वाटली आणि ती रोपं लावण्यासाठीही मदत केली. शेतकऱ्यांचं उत्पन्न महिना पंधरा हजार रुपयांवरून महिना दोन लाख ते तीन लाख रुपयांपर्यंत गेलं. पुढची सगळीच गोष्ट अत्यंत उत्कंठावर्धक आहे. globalparli.org या त्यांच्या वेबसाईटवर याबद्दलची अधिक माहिती मिळू शकते.

- रोटरीनं प्रत्येक महिना विशिष्ट कामासाठी योजला आहे. त्याबद्दल महत्त्व आणि काय करायचं हे सांगणारं पान
- शिवाय रोटरी इंटरनॅशनलबद्दल काही विशेष

तुमचा लेख आवर्जून द्या..
समन्वयक
योगेंद्र नातू / अभिजित देशपांडे

रोटरी

# End Polio Fundraiser - BHADIPA






## रश्मी उवाच

ऐकण्यासाठी क्लीक करा...

**रो. डीजी रश्मी कुलकर्णी**

## दिवाळी पहाट




रविवारी १५ नोव्हेंबरला संपन्न झालेल्या दिवाळी पहाट या कार्यक्रमात रसिकांना अनोख्या हिंदी आणि मराठी गाण्यांचा आनंद घेता आला. सौरभ दफ्तरदार, राजेश्वरी पवार, अनुश्री घोरपडे आणि दीपक महाजन या गायक मंडळींनी आपल्या सुरेल आवाजात प्रसिद्ध गाणी गात श्रोत्यांना मंत्रमुग्ध केलं. मुकेश देढिया, यश भंडारे, ऋतुराज कोरे, हर्षद गनबोटे, सचिन वाघमारे या वाद्यवृंदानं त्यांना उत्तम साथ दिली. या कार्यक्रमादरम्यान प्रश्नोत्तरांची स्पर्धासुद्धा ठेवण्यात आली होती तसंच विजेत्यांना आकर्षक बक्षिसंही देण्यात आली. या कार्यक्रमाचा आनंद लुटणाऱ्या कुटुंबांसाठी फोटो स्पर्धा ठेवण्यात आली होती. त्यांतल्या पहिल्या तीन कुटुंबाना बक्षिसं देण्यात आली.

## 'त्रिदल'ची 'पहाट दिवाळी'



'रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३१' आणि 'पुण्यभूषण फाउंडेशन, पुणे' यांनी एकत्र येऊन या वर्षीची 'पहाट दिवाळी' ऑनलाईन पद्धतीनं साजरी केली. या निमित्तानं 'त्रिदल'च्या निवडक मैफिलींचा स्मृतिगंध अनुभवण्याची संधी रसिक प्रेक्षकांना मिळाली.

शनिवार दिनांक १४ नोव्हेंबर २०२०, नरकचतुर्दशीच्या दिवशी सकाळी ७ वाजता 'दीपसूर तेजाळती' हा कार्यक्रम संपन्न झाला. पं. जसराज, रोणु मुझुमदार, तौफिक कुरेशी, रामदास पळसुले या दिग्गज कलाकारांनी त्यांच्या निवडक गीतांचं सादरीकरण केलं. हे सादरीकरण पुढील लिंकवर जाऊन बघू शकता.

पुण्यभूषण फाउंडेशन फेसबुक पेज लिंक–
https://www.facebook.com/Punyabhushan-Foundation-पुण्यभूषण-फौंडेशन-102642828318751/

व्हिडिओ इथे पाहा...

- **आपला क्लब रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३१ मध्ये येतो.**
- **डिस्ट्रिक्ट गव्हर्नर रश्मी कुलकर्णी यांचा संवाद**
- **या डिस्ट्रिक्टमधील विविध प्रोजेक्ट्स, कार्यक्रम**
- **डिस्ट्रिक्टमधील क्लब्सचे महत्त्वाचे, दखलपात्र असे प्रोजेक्ट्स**

**डिस्ट्रिक्ट कनेक्ट**

**तुमचा लेख आवर्जून द्या...**
**समन्वयक**
**योगेंद्र नातू / अभिजित देशपांडे**

# मधुरंजनी

**सादरकर्ते – श्री. धनंजय खरवंडीकर,**
**सौ.कविता खरवंडीकर**
**श्रुती खरवंडीकर आणि सहकारी**

**दिनांक– ९ नोव्हेंबर २०२०**



९ नोव्हेंबर २०२०च्या साप्ताहिक सभेला दीपावली विशेष 'मधुरंजनी' हा सांगीतिक कार्यक्रम आयोजित केला होता.

आपल्या रोटरीचा दरवर्षी साजरा होणारा मोठा कार्यक्रम... या वर्षी हा कार्यक्रम शासनाच्या निर्बंधांमुळे मोजक्या लोकांसोबत साजरा करावा लागला.

या कार्यक्रमासाठी रो. संदीप विळेकर आणि ॲन अंजली विळेकर यांनी आपला बंगला उपलब्ध करून दिला.

रो. रश्मी परुळकर यांनी अंतर्गत सजावट आणि स्टेज रचनेची संपूर्ण जबाबदारी उचलून त्यासाठी लागणारी आर्थिक मदत केली.

या कार्यक्रमाचं सादरीकरण आणि प्रक्षेपण चांगलं व्हावं यासाठी रो. प्रेसिडेंट सुदर्शन नातू, रो. संदीप विळेकर, रो. वेलणकर यांनी रो. मंदार पूर्णपात्रे, रो. रश्मी परुळकर आणि टीमसोबत काम केलं.

सगळ्यांच्या स्वागतासाठी बंगल्याच्या दारापासून रांगोळी, फुलं आणि पणत्यांची सजावट फर्स्ट लेडी सुगंधा नातू, ॲन अंजली विळेकर, रो. रश्मी परुळकर यांनी आणि त्यांच्या ऑफिस टीमनं केली.

संदीपच्या बंगल्यात अतिशय प्रसन्न, सुगंधित आणि आनंददायी वातावरण निर्माण झालं होतं.

रो. प्रेसिडेंट सुदर्शन नातू यांनी सर्व उपस्थितांचं स्वागत केलं. रो. मंदार पूर्णपात्रे आणि रो. रश्मी परुळकर यांनी या कार्यक्रमाचे सादरकर्ते श्री. धनंजय खरवंडीकर, सौ.कविता खरवंडीकर, श्रुती







खरवंडीकर आणि सहकारी यांचा परिचय करून दिला. नामांकित तबलावादक डॉ. देवीप्रसाद खरवंडीकर यांचे पुत्र श्री. धनंजय खरवंडीकर हे ज्येष्ठ तबलावादक पं. विनायकजी थोरात यांचे शिष्य आहेत. संगीत अलंकार पदवीप्राप्त, आकाशवाणी कलावंत, 'गुरुदेव पटवर्धन पुरस्कार, 'स्वरानंद पुरस्कार' अशा पुरस्कारांचे मानकरी म्हणून परिचित आहेत. मधुर आवाजाची दैवी देणगी लाभलेल्या सौ. कविता खरवंडीकर आग्रा आणि जयपूर घराण्याच्या गायिका आहेत. डॉ. अलका देव-मारुलकर, पं. बबनराव हळदणकर यांच्या शिष्या आहेत. त्या उपशास्त्रीय आणि सुगम संगीत गायिका, आकाशवाणी कलावंत आहेत. तसंच पं. पन्नालाल घोष पुरस्कार, माणिक वर्मा पुरस्कार यांच्या मानकरी म्हणून परिचित आहेत. हार्मोनियमसाठी उदय कुलकर्णी आणि डफ, शंख, टाळ, एकतारी या तालवाद्यांसाठी उद्धव कुंभार हे सहकलाकार लाभले होते.

'मधुरंजनी' या कार्यक्रमातील सर्व गीतं श्री. धनंजय खरवंडीकर यांनी संगीतबद्ध केली होती. नवीन संगीत रचनांचा अविष्कार या कार्यक्रमातून ते घडवत आहेत. यासाठी त्यांनी शब्दांना फार महत्त्व असलेल्या वैविध्यपूर्ण गीतरचनांची निवड केली होती.

कार्यक्रमाचा शुभारंभ डॉ. देवीप्रसाद खरवंडीकर लिखित 'तव तेजाचा प्रकाश पसरे, उजळे ही धरणी' या श्रुती आणि कविता यांनी गायलेल्या शारदास्तवनानं झाला. यानंतर या दोघींनी संत तुकारामांची अभंगरचना 'अंतरीची ज्योती प्रकाशली दीप्ती' सादर केली. कवी रमण रणदिवे लिखित 'शब्दास भान आहे शब्दास जागण्याचे' ही कलाकार आणि रसिकाचं नातं सांगणारी गझल कविता खरवंडीकर यांनी सादर केली. कवयित्री संगीता जोशी लिखित 'भाव यावे दाटुनी, येतो तसा पाऊस हा' हे गीत श्रुती खरवंडीकर यांनी सादर केलं. श्री. धनंजय यांनी लोकसंगीताच्या बाजावर संगीतबद्ध केलेलं इंदिरा संत लिखित 'हाके वरी आहे गाव याच आशेने चालले' हे गीत ही कविता आणि श्रुती यांनी सादर केलं. 'हरी आला रे हरी आला' संत ज्ञानेश्वरांची अभंग रचना आणि रावणकृत 'जटा कटा हसंभ्रम भ्रमन्नी लिंप निर्झरी' हे शिवतांडव स्तोत्र कविता आणि श्रुती यांनी सादर केलं. श्रुती यांनी 'दुरून चेहरा तुझा' ही कवी अनिल कांबळे यांची गजल, 'या फुलांनी छेडिली रानात गाणी' ही सुरेश भटांची गझल, शांता शेळके यांची 'जा रे जा सजना झणी जाई रे दूर' ही रचना, 'भेटवा साजण मला पावसाचा महिना आला' ही सुधीर मोघे यांची रचना सादर केली. धनंजय श्रुती आणि कविता यांनी गायलेल्या रामदास स्वामी लिखित 'पावन भिक्षा दे रे राम' या रचनेनं कार्यक्रमाची सांगता झाली.

रो. आयपीपी अभिजीत जोग यांनी खरवंडीकर कुटुंबीयांनी उत्तमोत्तम रचनांची निवड करून संगीतबद्ध करून अप्रतिम आवाजात सादर केल्याबद्दल आभार प्रदर्शन केलं.

कार्यक्रमानंतर आयोजित केलेल्या सुग्रास जेवणाची व्यवस्था रो. संजीव ओगले यांनी केली होती.

रो. आयपीपी अभिजीत जोग यांनी हा कार्यक्रम आयोजित करण्यासाठी कष्ट घेतलेल्या सर्वांचे विशेष आभार मानले.

**व्हिडिओ इथे पाहा...**

दिनांक– २३ नोव्हेंबर २०२०



रो. पीपी अरुण ब्रह्म
(प्रेसिडेंट - १९९१-९२)
निधन - १५ नोव्हेंबर २०२०



रो. सतीश कुलकर्णी
निधन - २१ नोव्हेंबर २०२०



लतिका वाळिंबे
(रो. हेमंत वाळिंबे यांच्या मातोश्री)
निधन - २३ नोव्हेंबर २०२०

रोटरी क्लब पुणे साऊथचे रो. पीपी अरुण ब्रह्म (१५.११.२०२०), रो. सतीश कुलकर्णी (२१.११.२०२०) आणि रो. हेमंत वाळिंबे यांच्या मातोश्री लतिका वाळिंबे (२३.११.२०२०) या तिघांना नोव्हेंबर महिन्यात देवाज्ञा झाली. त्यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी २३ नोव्हेंबर २०२० रोजी सभा आयोजित करण्यात आली होती. रो. सतीश कुलकर्णी यांच्या पत्नी मीना आणि पुत्र चेतन तसंच कन्या प्रिया या सभेला उपस्थित होते.

रो. प्रेसिडेंट सुदर्शन नातू यांनी श्रद्धांजली वाहताना रो. सतीश कुलकर्णी यांच्या आठवणी सांगितल्या. रो. सतीश कुलकर्णी २००१पासून रोटरी क्लब पुणे साऊथसाठी कार्यरत होते. रोटरीच्या कोणत्याही कार्यक्रमात रो. सतीश कुलकर्णी अतिशय उत्साहानं सहभागी होत. नुकतेच कोरोना महामारीच्या संसर्गातून ते पूर्ण बरे झाले होते. सतत कार्यमग्न असणाऱ्या रो. सतीश कुलकर्णी यांच्यावर काळानं अचानक घाव घातला.

रो. पीडीजी भाऊसाहेब कुदळे यांनी रो. सतीश कुलकर्णी यांच्या आठवणी सांगितल्या. रो. सतीश कुलकर्णी यांचा माणिकबाग, पुणे इथं फॅब्रिकेशनचा व्यवसाय होता. त्यांनी कोविड महामारीला प्रतिबंधक उपाय म्हणून सॅनिटायझर डिस्पेन्सिंग स्टँड पुण्यात प्रथम तयार केला.

रो. पीपी गोविंदराव पटवर्धन यांनी सांगितलं की रो. सतीश कुलकर्णी हे क्लबच्या पब्लिक रिलेशन कमिटीवर कार्यरत असताना त्यांनी पुण्यातल्या विविध सोसायटींमध्ये जाऊन रोटरी क्लबची माहिती देण्याची योजना आखली होती. उत्साही, कल्पक असं हे व्यक्तिमत्व होतं. रो. सतीश कुलकर्णी हे कुशल आणि सचोटीनं व्यवसाय करणारे व्यावसायिक होते. ते अतिशय कष्टाळू, मदतीला तत्पर, गुणग्राहक असे जवळचे मित्र होते.

रो. पीपी अरुण ब्रह्म हे तर रोटरी क्लबचे 'पितामह'... मदतीसाठी सदैव तत्पर. असं सांगून रो. पीपी सोनल पटवर्धन यांनी कुलकर्णी आणि ब्रह्म कुटुंबीयांचं सांत्वन केलं.

रो. सतीश कुलकर्णी यांनी एचआयव्हीबाधितांसाठी काम केलं होतं. रो. उद्धव गोडबोले यांनी या कामाचा उल्लेख करताना मदतीसाठी धावून येणारा जिवलग मित्र आपल्याला कायमचा सोडून गेल्याची भावना व्यक्त केली.

रो. पीपी अरुण ब्रह्म १९८०पासून रोटरी क्लब पुणे साऊथसाठी कार्यरत होते. ते संगणक तज्ज्ञ होते. किर्लोस्कर न्यूमॅटिक कंपनीमधून व्हाईस प्रेसिडेंट म्हणून निवृत्त झाल्यावर रो. पीपी अरुण ब्रह्म यांनी स्वतःचा डाटा प्रोसेसिंगचा व्यवसाय सुरु केला. १९९२मध्ये रोटरी क्लब पुणे साऊथचे ते प्रेसिडेंट झाले. १९९४–९५मध्ये त्यांनी सेक्रेटरीपदी काम केलं. रोटरी क्लबच्या प्रेसिडेंटपदी

काम केल्यानंतर सेक्रेटरीपदी काम करणारं हे एकमेव व्यक्तिमत्त्व असावं. रो. पीडीजी भाऊसाहेब कुदळे गव्हर्नर असताना रो. पीपी अरुण ब्रह्म यांनी डिस्ट्रिक्ट सेक्रेटरीपदाची जबाबदारी सांभाळत रो. पीडीजी भाऊसाहेब कुदळे यांना खूप मदत केली. कॉर्पोरेट स्टाईलनं त्यांनी तयार केलेला ड्यूटीचार्ट खूप प्रसिद्ध झाला. स्कीट लिहिणं, त्याचं दिग्दर्शन आणि त्याचं सादरीकरण यांची त्यांना विलक्षण आवड होती. रो. पीडीजी भाऊसाहेब कुदळे यांनी रोटरी क्लबमधला असा हरहुन्नरी मित्र आणि सहकारी गमावल्याच्या भावना व्यक्त केल्या.

रो. पीपी गोविंदराव पटवर्धन यांनी रो. पीपी अरुण ब्रह्म यांच्या आठवणी सांगितल्या. रो. पीपी अरुण ब्रह्म १९८१पासून रोटरी क्लब पुणे साऊथसाठी कार्यरत होते. रो. पीपी गोविंदराव पटवर्धन यांनी त्यांच्या स्कीट लेखनाचा आवर्जून उल्लेख केला. रोटरीच्या बुलेटीनसाठी अरुण यांनी तीन वेळा संपादक म्हणून काम पाहिलं. 'विक्रम आणि वेताळ', 'ब्रह्म चिंतन' या नावांनी ते लिहीत. बुलेटीन लेखनासाठी त्यांना बक्षिसंही मिळाली. रोटरी क्लबचे 'ब्रह्मास्त्र' असलेले अरुणजी उत्तम लिहीत. गंभीर विषयही हलक्याफुलक्या शब्दांत समजावून सांगत. 'काजवा' या मासिकासाठी ते लिहीत. मार्मिकता हा त्यांचा लेखनविशेष... रोटरी क्लबचा अडोतीस वर्षांचा इतिहास सांगणारं पुस्तक त्यांनी लिहिलं आहे. रो. पीपी अरुण ब्रह्म कॉम्प्युटर सोसायटी पुणे चॅपटरचे तीन वेळा अध्यक्ष होते. अरुण यांच्या निधनानं मोठा भाऊ गमावल्याचं दुःख झाल्याचं रो. पीपी गोविंदराव पटवर्धन यांनी सांगितलं.

रो. पीपी राजेंद्र गोसावी यांनी रो. पीपी अरुण ब्रह्म यांच्या आठवणी सांगितल्या. वयानं लहान असलेल्या रोटेरिअन्सशीही रो. पीपी अरुण ब्रह्म अत्यंत खेळीमेळीनं वागत. फेसबुकवर तर हे नेहमी असत, गप्पा मारत.

रो. दत्ता पाषाणकार यांनी रो. सतीश कुलकर्णी, रो. पीपी अरुण ब्रह्म हे दोन जवळचे मित्र, मोठे भाऊ गमावल्याच्या भावना व्यक्त केल्या.

रो. पीपी अनिलदा सुपनेकर यांनी रोटरी कुटुंबातील मित्र रो. सतीश कुलकर्णी, रो. पीपी अरुण ब्रह्म यांच्या निधनानं क्लेशकारक वेदना झाल्याची भावना व्यक्त केली आणि श्रद्धांजली वाहिली.


रो.सतीश कुलकर्णी यांचे पुत्र चेतन यांनी रोटरी क्लबशी जुळलेले स्नेहबंध आणि सर्व सभासदांनी त्यांच्या कुटुंबाला दिलेला भावनिक आधार यांबद्दल कुलकर्णी कुटुंबीयांतर्फे रोटरी क्लब पुणे साऊथचे आभार मानले.

## गडरागिणी – प्रतिभा तीर्थगिरीकर–सिरिया

**समन्वयक – रो. मृदुला घोडके**


दिनांक– ३० नोव्हेंबर २०२०

३० नोव्हेंबरच्या मिटींगचं मुख्य आकर्षण होतं डॉक्टर, आहार आणि फिटनेस तज्ज्ञ, योगा सुवर्णपदक विजेत्या, चित्रपटनिर्मात्या, गृहबांधणी अशा अनेक क्षेत्रांत कार्यशील असलेल्या आणि गडरागिणी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सौ. प्रतिभा तीर्थगिरीकर/सिरिया यांच्याशी गप्पा...





महाराष्ट्र हा गडकिल्ल्यांचा राजा आहे त्यामुळं इथं गडभ्रमंती ही खूप अभिमानस्पद मानली जाते. गडभ्रमंतीच्या अशा अनेक मोहिमा यशस्वीरीत्या करणाऱ्या प्रतिभा यांनी वयाची पन्नाशी पूर्ण होईपर्यंत पन्नासपेक्षा जास्त किल्ले सर करायचेच असा संकल्प केला... आश्चर्याची आणि कौतुकाची गोष्ट म्हणजे हे सर्व गड सर केले... तेही केवळ पंधरा महिन्यांत....




अशा या गडरागिणीशी रो. मृदुला घोडके यांनी अतिशय सहजतेनं, हसतखेळत, कधी प्रश्न विचारून, तर कधी विशेष आठवणींचा उल्लेख करून संवाद साधला. चिरतरुण, उत्साही प्रतिभा यांच्याकडे पाहून फिटनेसचं महत्त्व जाणवतं. त्यांचा जीवनाकडे बघण्याचा सकारात्मक दृष्टीकोन, वेळेचं आणि कामाचं उत्तम नियोजन, साहसी वृत्ती आणि या सगळ्याला पूरक असा आत्मविश्वास वाखाणण्याजोगा आहे. या गड मोहिमा त्यांनी कशा फत्ते केल्या, त्यासाठी काय काय पूर्वतयारी केली, काय काळजी घेतली, अडचणींवर कशी मात केली... इथपासून ते इतरांना जर अशी गड भ्रमंती करायची असेल तर त्यांनी काय केलं पाहिजे इथपर्यंतच्या अनेक गोष्टी सांगत, काही फोटोंच्या स्लाइड्सद्वारे या संकल्पपूर्तीच्या यशाचं रहस्य उलगडून सांगितलं.

या मोहिमांची सुरुवात कधी आणि कशी झाली हे सांगताना त्या म्हणाल्या की, त्या नियमितपणे योगासनं करत होत्याच... त्यांच्या दुसऱ्या मुलाच्या दहावीनंतर म्हणजे वयाच्या पंचेचाळिशीनंतर रोज पळायला जाणं, सायकल चालवणं, ट्रेकिंग करणं अशा गोष्टींना त्यांनी सुरुवात केली. प्रोटीन, व्हिटामिन डायट कसं असतं ते त्यांना माहीत होतंच... ते त्यांनी करायला सुरुवात केली... त्यामुळं त्यांना स्टॅमिना वाढवता आला. वडील फॉरेस्ट ऑफिसर असल्यानं त्यांना जंगलाची आवड होतीच पण ट्रेकिंग केलं नव्हतं... मग पुण्यात आल्यावर त्या घनगडला एका नातेवाइकांबरोबर ट्रेकिंगला गेल्या. तिथं गेल्यावर त्यांना तिथलं वातावरण आवडलं आणि आपण हे सहज करू शकतो, यातून एक वेगळा आनंद आहे हे त्यांना जाणवलं आणि ट्रेकिंगला सुरुवात झाली.






यात अवघड गड कुठले आणि आत्तापर्यंत तू कुठले सर केलेस... असं विचारल्यावर त्यांनी जवळपास साठ गड सर केल्याचं सांगितलं. यासाठी त्यांनी सोप्या गडापासून सुरुवात केली. जसं की, तिकोना... असे गड निवडत, कधी गुगल मॅपच्या साहाय्यानं रस्ते शोधत, स्वतः गाडी चालवत त्या पुण्याजवळच्या साधारण दीडशे किलोमीटर परिसरातल्या गडांवर जायला लागल्या. एका दिवसात जाऊन परत यायचं असं त्यांचं ठरलेलं असायचं. मैत्रिणींसोबत त्या भल्या पहाटे घरून ड्रायफ्रुट्स, फळं, पाणी, औषधं वगैरे घेऊन निघायच्या. गडाच्या पायथ्याशी थोडंफार खाऊन गड चढायला सुरुवात करायच्या. सोबतीला गावातलाच वाटाड्या घ्यायच्या. कधी गड उतरल्यानंतर त्यांच्याकडे जेवणही करायच्या.

गडावरचं निसर्ग सौंदर्य मनाला विलक्षण आनंद, सुख देणारं असतं. प्रत्येक चढणीवरून दिसणारं निसर्गाचं वेगळं रूप आणि उंच गडापुढे जाणवणारं आपलं खुजेपण आपल्याला कायम जमिनीवर ठेवतं असं त्यांना वाटतं. गडावर दिसणारे प्राणी, पक्षी यांचे फोटो, व्हिडिओ त्यांनी दाखवले. प्रत्येक गडावर काही गोष्टी असतातच. जसं की, पाण्याचं टाकं, मारुती-महादेव यांची मंदिरं... काही गडांना माची असतात, काहींना गोमुखद्वार असतं.

या विषयावरचं त्यांचं गडरागिणी हे पुस्तक प्रतिभा पाटील यांच्या हस्ते प्रसिद्ध झालं आहे. बुकगंगानं ते पुस्तक परत प्रकाशित केलं आहे. गडप्रेमी, वाचक यांनी ते जरूर वाचावं असं आहे.

अशा उत्तरोत्तर रंगत गेलेल्या संवादाचा शेवट रो.उद्धव गोडबोले यांनी आभारप्रदर्शन करून केला.

व्हिडिओ इथे पाहा...

➢ **क्लबच्या साप्ताहिक सभांचा सभेनुसार गोषवारा**

**साप्ताहिक सभा**

**तुमचा लेख आवर्जून द्या...**
**समन्वयक**
**एके / यामिनी पोंक्षे**


## क्लबकारी

## जॉइंट मिटिंग – ०६–११–२०२०

**विषय – मला भेटलेली प्रभावशाली माणसे**

**वक्ते – रो. पीडीजी डॉ. दीपक शिकारपूर**

ऐकण्यासाठी क्लीक करा...




जर माणसाला समाज समजून घ्यायचा असेल तर त्यात मिसळलं पाहिजे. आपल्याला आयुष्यात विविध माणसांचा सहवास लाभतो. अनेक चांगलीवाईट माणसं भेटतात... पण त्यांच्यातला वाईटपणा सोडून चांगुलपणाच आयुष्यभर स्मरणात ठेवावा. येणाऱ्या भावी पिढ्या श्रीराम, श्रावणबाळ यांच्यासारख्या पौराणिक व्यक्तिरेखा स्मरणात ठेवतील की नाही याविषयी कल्पना नाही... पण दारिद्र्यात जन्माला येणं शाप नाही. अपार कष्ट, प्रामाणिकपणा, वक्तशीरपणा, जगण्यातला साधेपणा यांतून कोणताही माणूस मोठा होऊ शकतो ही बाब मात्र प्रत्येकानं लक्षात ठेवायला हवी.

रतन टाटा, अब्दुल कलाम, अमिताभ बच्चन, प्रिन्स चार्ल्स, नारायण मूर्ती, सुधा मूर्ती, शरद पवार, प्रमोद महाजन, राहुल बजाज, नंदन निलकेणी, एम.एस. धोनी, डॉक्टर रघुनाथ माशेलकर, लीला पूनावाला, पंडित शिवकुमार शर्मा, शंकर महादेवन, अजीम प्रेमजी, दादा वासवानी आणि जयंत नारळीकर अशा दिग्गज लोकांच्या विचारांचा डॉ. दीपक शिकारपूर यांच्या जीवनावर झालेला प्रभाव या विषयावरचं व्याख्यान ऐकण्याची संधी म्हणजे आपल्या जीवनात विचारांचा कोहिनूर हिरा मिळाल्याचं समाधान असं मी म्हणेन.

एखाद्या व्यक्तीचा प्रभाव आपल्या जीवनात कुठपर्यंत असू शकतो याचं जिवंत उदाहरण म्हणजे विश्वास नांगरे पाटील...

असं जीवन जगलेल्या माणसांचे विचार ऐकायला मिळावेत आणि इतरांनाही त्या दिशेनं वाटचाल करण्यासाठीची प्रेरणा देण्याच्या उद्देशानं 'मला 'भेटलेली प्रभावशाली माणसे' हा कार्यक्रम आयोजित केला होता. त्याद्वारे सगळ्यांना असंख्य लोकांच्या जीवनाचं सार समजून घेण्याची संधी मिळाली.

रोटरी क्लब ऑफ पुणे सहवास, रोटरी क्लब ऑफ पुणे साऊथ, रोटरी क्लब ऑफ पुणे शिवाजीनगर, रोटरी क्लब ऑफ पुणे गांधी भवन, रोटरी क्लब ऑफ पुणे कात्रज आणि रोटरी क्लब ऑफ पुणे मगरपट्टा इलाईट या सगळ्या क्लब्जनी मिळून पीडीजी डॉ. दीपक शिकारपूर यांचं व्याख्यान आयोजित केलं होतं. या व्याख्यानाचा सर्व रोटेरिअन्सनी आस्वाद घेतला.

## गरजू कुटुंबाना धान्य आणि फराळ वाटप

**रो. प्रे. सुदर्शन नातू**

ऐकण्यासाठी क्लीक करा...



दिवाळीनिमित्तानं रोटरी क्लब ऑफ पुणे साऊथतर्फे दरवर्षी समाजातल्या गरजू लोकांना धान्यवाटपाचा आणि फराळवाटपाचा कार्यक्रम करून त्यांची दिवाळी आनंदमय करण्याचा प्रयत्न करत असतो.

मंगळवारी १० नोव्हेंबरला रोटरी क्लब ऑफ पुणे साऊथच्या सदस्यांनी कलाप्रसाद इथे पंधरा एचआयव्हीबाधित कुटुंबातल्या जवळपास ६० कुटुंबीयांना धान्य, मिठाई आणि ब्लँकेट्स यांचं वाटप केलं. या कार्यक्रमाला रो. डीजी रश्मी कुलकर्णी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या. गेली सोळा वर्षं सातत्यानं चाललेल्या आपल्या या उपक्रमाचं त्यांनीही कौतुक केलं. एचआयव्हीबाधित कुटुंबांना चितळे बंधूंकडून मिठाई देण्यात आली आणि रोटरीमित्र श्री. धनेश चित्राव



यांच्याकडून ब्लँकेट्स दिली. या योगदानाबद्दल त्यांचे आभार...

याच कार्यक्रमात रोटरी क्लब ऑफ पुणे साऊथनी ‘कोरोना योद्धा’ सन्मानपत्र देऊन चि. सारंग आनंद सराफ या तरुणाचा सत्कार केला. रो.आनंद बदामीकर यांनी चमचमीत फेलोशीप दिली आणि एचआयव्ही/एड्स कमिटीकडे रु.१०,०००/-चा चेक सुपुर्द केला त्याबद्दल त्यांचे आभार. तसंच रो. संजीव महाजन यांनी त्यांच्या वाढदिवसानिमित्त रु. ५०००/- दिले आहेत. त्यांचेसुद्धा आभार.

हा सुंदर कार्यक्रम आयोजित करण्यासाठी ॲन स्वाती वेलणकर आणि रो.किरण वेलणकर, रो. रमेश गोंदकर आणि रो. आनंद बदामीकर यांनी विशेष परिश्रम घेतले.

१३ तारखेला रोटरी क्लब पुणे साऊथच्या सदस्यांनी वेल्हे तालुक्यातल्या सव्वाशे कुटुंबांना धान्य, मिठाई आणि साड्यां यांचं वाटप केलं. पासलीला ‘पाऊलवाट फाउंडेशन’ इथे हा कार्यक्रम आयोजित केला होता. आपल्या क्लबचे पंचवीस सदस्य पासली इथे हजर होते. या कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी क्लबचे सदस्य सकाळी कलाप्रसाद इथे जमले आणि तिथून विपीनभाईकडे दाखल झाले. दिवाळीचा फराळ, चहा घेऊन आणि शंभर किलो लाडूंचे बॉक्स घेऊन क्लबचे सदस्य पासलीला रवाना झाले. वाटेत वेल्हे इथे दत्तांजली यांनी जातीनं हजर राहून उत्कृष्ट वडापावची फेलोशीप दिली. तिथून सर्व जण साडेअकरा वाजता पासलीला पोहोचले. जवळपासच्या गावांतल्या







सव्वाशे कुटुंबांतले सदस्य हजर होते. आपल्या क्लबबरोबरच ‘प्राज’ कंपनीचे आणि ‘झेप’ संस्थेचे सदस्य आणि इतर हितचिंतक हजर होते. सर्वांना दिवाळी किट्सचं वाटप करण्याचं काम आपल्या ॲन्स आणि लेडी रोटेरिअन्स यांनी उत्तम प्रकारे केलं. या सुंदर कार्यक्रमानंतर सर्व सदस्य रो. नितीन पाठक यांच्या साईटवर लंचसाठी गेले. पिठलं, भाकरी, ठेचा, चटणी, इंद्रायणी तांदळाचा भात असा स्पेशल बेत त्यांनी केला होता. सर्वांनी त्याचा मनापासून आस्वाद घेतला आणि मजा केली. सोबतीला गोड पदार्थ म्हणून उत्तम बुंदी लाडू...!

या उत्तम अशा कार्यक्रमानंतर क्लबचे सदस्य धनत्रयोदशीची पूजा गाठण्यासाठी पुण्यात परतले.

या दोन्ही कार्यक्रमांचं वैशिष्ट्य म्हणजे आपल्या क्लबच्या सदस्यांनी दिलेल्या उत्तम प्रतिसादामुळं क्लबचे सदस्य धान्याची एकशे चाळीस किट्स तयार करू शकले आणि एड्सबाधित पंधरा



कुटुंबांना तसंच पासलीमधल्या सव्वाशे कुटुंबांना क्लबचे सदस्य मदत देऊ शकले. रो. माधुरी किरपेकर यांनी शंभर साड्या, रो. विपीन यांनी शंभर किलो लाडू आणि श्रीभाऊ चितळे यांनी मिठाई... अशी मदत केली.

या सगळ्याचं सुयोग्य नियोजन होऊ शकलं ते विनोदभाई अगरवाल यांच्यामुळं! त्यांनी उत्तम प्रतीच्या धान्याच्या किट्स अतिशय कमी किमतीत उपलब्ध करून दिली... त्याबद्दल त्यांचे धन्यवाद... रो. नितीन पाठक यांचे विशेष आभार आणि कौतुक. त्यांच्यामुळं रोटरी क्लब ऑफ पुणे साऊथ या दुर्गम भागातल्या लोकांना मदत करू शकतो.

या वर्षी आपल्या नवीन सभासदांचा सहभाग आणि त्यांनी केलेली मदत खूप उत्साहवर्धक आहे. त्यांचंही अभिनंदन आणि

## *Activities for upcoming months*

***Sports Committee***

Dear RCPS Family,

A month ago we enjoyed Sudoku game. It was appreciated by all members and enjoyed by participants. RCPS Sports Committee would like to plan a few more activities in the coming months. After the pandemic is over and life returns to normal we can have group activities.

Sports Committee would love to hear your voice. Kindly fill-up the form to register your feedback.

We will appreciate if you can request your spouse or annets to fill in the form. This information will help us to plan activities where most members can participate.

Click on the link below to fill the form.


https://forms.gle/SJpPUvR9woLNFiT68

Thank you for your feedback.

## बीओडी – जॉइंट मिटिंग

बोर्डाच्या जॉइंट मिटिंगमध्ये झालेला फेलोशीपचा कार्यक्रम उत्तम झाला. संख्येच्या मर्यादेमुळं काहीच सदस्यांना या मिटिंगला येता आलं. क्लबचे सगळे सदस्य या मिटिंगमध्ये सहभागी होऊ शकले नाहीत... मात्र लवकरच तसा योग जुळून येईल अशी अपेक्षा करू या....






| Month | Unique visitors | Number of visits | Pages | Hits | Bandwidth |
|---|---|---|---|---|---|
| Jan 2020 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| Feb 2020 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| Mar 2020 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| Apr 2020 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| May 2020 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| Jun 2020 | 54 | 125 | 14,558 | 38,737 | 3.68 GB |
| Jul 2020 | 698 | 1,222 | 34,655 | 99,815 | 4.17 GB |
| Aug 2020 | 599 | 1,022 | 23,029 | 70,406 | 7.92 GB |
| Sep 2020 | 556 | 1,015 | 27,898 | 73,552 | 6.47 GB |
| Oct 2020 | 370 | 744 | 13,902 | 37,612 | 182.86 GB |
| **Nov 2020** | 46 | 74 | 751 | 3,813 | 19.94 GB |
| Dec 2020 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| Total | 2,323 | 4,202 | 114,793 | 323,935 | 225.04 GB |

| | | | |
|---|---|---|---|
| United Arab Emirates | ae | 4,698 | 6,791 |
| United States | us | 309 | 2,335 |
| Great Britain | gb | 33 | 138 |
| Singapore | sg | 31 | 199 |
| Indonesia | id | 15 | 169 |
| Italy | it | 9 | 9 |
| Bangladesh | bd | 7 | 84 |
| Romania | ro | 6 | 6 |
| Czech Republic | cz | 5 | 5 |
| France | fr | 4 | 5 |
| Austria | at | 3 | 3 |
| Albania | al | 3 | 3 |
| Russian Federation | ru | 2 | 2 |

**Pages-URL**

| Filter **bulletin** - Exclude Filter **nov**: 26 different pages-url<br>Total: 120 different pages-url | Viewed |
|---|---|
| /bulletin-cover-oct/ | 381 |
| /bulletin-cover-oct/bulletin-rotary-oct/ | 250 |
| /bulletin-cover-oct/bulletin-district-oct/ | 166 |
| /bulletin-cover-oct/bulletin-clubkari-oct/ | 150 |
| /bulletin-cover-oct/bulletin-kalakari-oct/ | 136 |
| /bulletin-cover-oct/bulletin-saptahik-sabha-oct/ | 136 |
| /bulletin-cover-oct/bulletin-vishesh-oct/ | 119 |

- अध्यक्ष सुदर्शन संवाद
- विविध विभाग संचालक किंवा कमिटी मुख्य संवाद
- क्लबमधील विविध प्रोजेक्ट्स, कार्यक्रम, फेलोशिप्स
- जावे त्यांच्या क्षेत्रा.../ मागील एखाद्या प्रोजेक्टची गोष्ट

तुमचा लेख आवर्जून द्या....
समन्वयक
आनंद / यामिनी

## क्लबकारी

# दशावतार आणि उत्क्रांती (भाग ४)

रो. डॉ. सुभाष देशपांडे

त्रेता युगातला पहिला अवतार म्हणजे वामन अवतार. हा उत्क्रांतीमधला संक्रमणाचा काळ आहे. पशू-मानव या स्थितीतून आता मानव निर्माण होण्यास सुरुवात झाली. हा मानव उंचीनं कमी होता. प्राचीन मानवाची उंची अफ्रिकेत आणि इतर ठिकाणी मिळालेल्या सांगांड्यांवरून ठरवली गेली आहे. हे सांगाडे अर्धवट आणि संख्येनं कमी आहेत त्यामुळं या मानवांची उंची हा एक वादग्रस्त विषय आहे. काहींच्या मते प्राचीन मानवाची उंची पाच फुटांच्या आसपास असावी. काहींच्या मते तो सहा फुटांच्या जवळपास असावा. प्राचीन मानव अफ्रिकेत उगम पावला. आजही अफ्रिकेत बुटके (पिग्मी) लोक आहेत.

वामन सेनोझोईककाळातला आहे. हा काळ सहासष्ट कोटी वर्षांपासून आजपर्यंत चालत आला आहे. वामन बुटका होता. त्यानं महाबळी या राक्षसाचा पराभव केला. साधारण वीस हजार वर्षांपूर्वी वामन अवतरला असावा. ऋगवेदामध्ये वामनाचा उल्लेख आहे. वामन, ऋषी कश्यप आणि अदिती यांचा मुलगा. महाबळी अथवा बळी हा हिरण्यकश्यपूचा पणतू आणि प्रल्हादचा नातू. त्याच्या वडलांचे नाव विरोचीना. महाबळीनं केलेल्या यज्ञात वामन अवतार संपला. वामनानं तीन पावलं ठेवण्याएवढी जागा बळीराजाकडं मागितली; त्यानंतर प्रचंड रूप धारण करून त्यानं दोन पावलांत स्वर्ग आणि पृथ्वी व्यापली आणि तिसर्या पावलात बळी राजाला पाताळात धाडलं.

त्रेता युगामधले नंतरचे अवतार परशुराम आणि श्रीराम आहेत. परशुरामांनी अत्याचारी क्षत्रियांचा पराभव केला; तर श्रीरामांनी व्यभिचारी रावणाचा द्वापार युगात श्रीकृष्ण आणि बलराम हे अवतार मानले जातात. श्रीकृष्ण अधर्मी कौरवांच्या नाशाला कारणीभूत झाले. परशुराम, श्रीराम, श्रीकृष्ण आणि बलराम हे अनुक्रमे मानवी उत्कर्षाची उदाहरणं आहेत. वैष्णव समाजाला बुद्ध हे नववे अवतार म्हणून मान्य नाहीत. त्यांच्या मते बलराम आठवे अवतार असून श्रीकृष्ण हे नववे अवतार आहेत. श्रीरामांच्या मृत्यूनंतर त्रेता युग संपलं आणि द्वापार युग सुरू झालं. श्रीकृष्णांच्या मृत्यूनंतर द्वापार युग संपलं आणि कलियुग सुरू झालं.

कलियुगात गौतम बुद्धांचा अवतार मानला जातो. नववे अवतार बलराम की गौतम बुद्ध यांबाबत मतभेद आहेत. गौतम बुद्धांनी काम, क्रोध आणि हिंसा यांवर विजय मिळवला. हिंदू धर्माचा ऱ्हास थांबवण्यासाठी गौतम बुद्धांना नववा अवतार मानलं गेलं असावं.

कलियुगातला दुसरा अवतार म्हणजे कलकी हा येणारा अवतार आहे. हा अवतार अधर्मीयांचा पाडाव करून सत्ययुगाची सुरुवात करून देणारा आहे. तो देवदत्त नावाच्या पांढऱ्या घोड्यावर स्वार होणार असून त्याच्या हातात चकाकती तलवार आहे. बौद्ध लिखाणातसुद्धा कलकीची वर्णनं आहेत. इस्लाममध्येसुद्धा कलकी अवतार मानला जातो. कलकीचं मूळ नाव 'करकी' म्हणजे पांढरा शुभ्र घोडा असं असावं. त्याचा अपभ्रंश 'कलकी' झाला असावा. कलकीचं नाव जरी वेदांमध्ये नमूद केलेलं असलं तरी महाभारत आणि पुराणात त्याबद्दल जास्त माहिती मिळते. कलकीसारखीच संकल्पना ज्यू झोरास्ट्रीअन आणि ख्रिश्चन धर्मांमध्येसुद्धा आहे. ख्रिश्चन धर्मात ख्रिश्चन अडव्हेंट ही संकल्पना कलकी अवतारावर कल्पिली असावी असं मत आहे. ॲडव्हेनटिस्ट यांच्या तत्वाप्रमाणं जिझस क्राईस्ट परत पृथ्वीवर जन्म घेईल आणि सर्वांना मोक्ष प्राप्त होईल, सर्व दुष्ट वृत्ती नाहीशा होतील आणि पृथ्वीवर सर्वत्र शांतता तसंच सुबत्ता नांदेल. हे सगळं वर्णन कलकी आणि त्यानंतर येणार्या सत्ययुगाशी सुसंगत आहे. कलियुग चार लाख ते चार लाख बत्तीस हजार वर्षांचं गृहीत धरलं आहे. आजपासून चार लाख सत्तावीस हजार वर्षांनी कलकी अवतरेल असं मानलं जातं.

या लेखावरून लक्षात येईल की आपल्या पूर्वजांना मानवी उत्क्रांतीविषयी पूर्ण कल्पना होती. एवढंच नव्हे तर पृथ्वीवर दळणवळणांची आधुनिक साधनं उपलब्ध नसतानासुद्धा विचारांची देवाणघेवाण चालू होती. कोणत्याही आधुनिक तंत्रज्ञानाशिवाय हे सर्व ज्ञान त्यांना कसं मिळालं असेल हे देवालाच माहीत.

# आवळी भोजनाचं महत्त्व

**ॲन कांचन आनंद बदामीकर**

ऐकण्यासाठी क्लीक करा...

मस्त गुलाबी थंडी पडतेय... या दिवसांत आठवण होते ती हुरडा, शेकोट्या, भाकरी-पिठलं, वांग्याचं भरीत, भजी, कुरडई, झणझणीत मिरचीचा ठेचा... आऽ हाऽ हाऽ नुसत्या कल्पनेनंच तोंडाला पाणी सुटतं... त्यातून हे सगळं निसर्गाच्या सान्निध्यात खायला मिळालं तर... मग काय बहारच... नाही का?

थंडीच्या दिवसांत मुबलक प्रमाणात ताज्या भाज्या आणि ताजी फळं उपलब्ध असतात. चिंचा, बोरं, आवळेही सगळीकडं भरपूर मिळतात. तब्येत ठणठणीत करण्यासाठी हा उत्तम काळ.

आज मंडईतून हिरवेगार आवळे आणले आणि लहानपणीच्या काही आठवणी जाग्या झाल्या. माझ्या आजीकडून आवळ्याविषयी खूप ऐकलं होतं. आजी आवळ्याचे खूप छान छान पदार्थ करायची. मोरावळा, आवळा कँडी, लोणचं, सुपारी असे... माझी आईसुद्धा आवळ्यापासून सुपारी, मोरावळा करते. आपल्याला माहीतच आहे की, आवळ्याला आपल्याकडं अनन्यसाधारण महत्त्व आहे. सगळ्यांना दीर्घायुष्य देणारं फळ म्हणून याकडे बघितलं जातं... आणि विशेष म्हणजे आवळा कुठल्याही स्वरूपात खाल्ला तरी त्याचे गुणधर्म कमी होत नाहीत. यामध्ये क जीवनसत्त्व खचाखच भरलेलं आहे. नियमितपणे आवळ्याचं सेवन केलं तर आपण दीर्घ काळासाठी तरुण दिसतो, त्वचा उजळ दिसते, चेहऱ्यावर तेज येतं, दृष्टी सुधारते, केस काळेभोर आणि मुलायम राहतात. पोट साफ होतं त्यामुळं त्वचेवरची मुरुमं, पुटकुळ्या, डाग नाहीसे होतात. स्त्री-आरोग्याविषयीच्या ज्या काही तक्रारी असतील त्या दूर होतात. गर्भधारणेसाठी मदत होते, एजिंग प्रोसेस मंदावते. यानं तुमचं सौंदर्य इतकं खुलतं की, तुम्हाला कधीच संतूर साबणाची गरज लागणार नाही.

माझ्या लहानपणी मला आणि माझ्या भावंडांना आवळ्याचं महत्त्व कळावं आणि एकत्रित छान सहल व्हावी या हेतूनं आम्ही आवळी भोजन आयोजित करत असू. कार्तिक महिन्यात, साधारणपणे तुळशीच्या लग्नानंतर आम्ही हा बेत आखायचो. जिथं म्हणून आवळ्याची झाडं असतील तिथं आम्ही सहल काढायचो. घरून काही पदार्थ करून न्यायचो आणि काही पदार्थ आवळ्याच्या झाडाखाली करायचो. आवळ्याच्या झाडावर वात लावून किंवा तुपाचे दिवे करून प्रथम झाडाची पूजा करून नैवेद्य दाखवायचो आणि सर्वांच्या दीर्घायुष्यासाठी प्रार्थना करायचो. आमच्यातली काही वडीलधारी मंडळी श्लोक म्हणायची...

धात्रिदेवी नमस्तुभ्यं सर्वपापक्षयंकरि।  
निरोगं कुरु मां नित्यं निष्पापं धात्रि सर्वदा।।

हा श्लोक म्हणून झाल्यावर आवळ्याच्या झाडाचं पूजन करतात.

निसर्गाच्या सान्निध्यात फार मजा यायची. जेवणं उरकल्यावर काही जण पथारी पसरून निद्रेच्या अधीन व्हायचे तर काही जणांच्या गप्पांना ऊत यायचा. काही जण झाडाखाली ध्यानस्थ होऊन बसायचे. जणू काही ते त्या झाडाशी संवाद साधत असायचे. माझी आजी मग सगळ्यांना या झाडाचं महत्त्व सांगायची. आवळ्याच्या झाडामध्ये ब्रह्मा, विष्णू आणि महेश यांचं वास्तव्य आहे. असं म्हणतात की, साऱ्या सृष्टीचं पालन करणाऱ्या आपल्या लाडक्या देवतेचं भगवान श्री विष्णूंचं स्थान या झाडाच्या मुळापाशी आहे म्हणून त्याची पूजा करतात. आवळा अमृतासमान असल्यामुळं लक्ष्मी-नारायणाला अत्यंत प्रिय आहे. विष्णूला आवळ्याचाच नैवेद्य दाखवतात. या झाडाच्या सान्निध्यात राहिल्यामुळं आपल्याला सकारात्मक ऊर्जा मिळते. तसंच मन प्रसन्न आणि आनंदित होतं... त्यामुळं आवळ्याचं नियमित सेवन केलं पाहिजे. सुट्टीत आपण आपल्या मुलांना आवळी भोजनाच्या निमित्तानं अशाच निसर्गरम्य वातावरणात नेलं तर त्यांनाही याची माहिती मिळेल आणि झाडांचं महत्त्व पटेल.

आजही जेव्हा वेळ मिळेल तेव्हा आम्ही असं आवळी भोजन आयोजित करण्याचे मनसुबे आखत असतो. आमचे एक स्नेही

श्री. ॐकार देशपांडे यांचं सिंहगडच्या पायथ्याशी डोणजे गावात ‘गप्पांगण’ नावाचं एक सहलीचं स्थळ आहे. त्यांच्या इथं आवळ्याची झाडं असल्यामुळं आमची ही हौस भागते.

असं म्हणतात की, आपल्या घराभोवती एक तरी आवळ्याचं झाड लावलं गेलं पाहिजे. शक्यतो घराच्या दक्षिणेला हे झाड लावतात... त्यामुळं घराभोवती सकारात्मक ऊर्जा राहते आणि वाईट प्रवृत्ती नाहीशा होतात. साधारणपणे रथसप्तमीनंतर सूर्य थोडा प्रखर व्हायला लागतो. अशा वेळेस जर आपण आवळा किसून तो त्या उन्हामध्ये काही काळ ठेवला तर तो सूर्याकडून वर्षभराची ऊर्जा आपल्याकडे ओढून घेतो... त्यामुळं या आवळ्याकडून आपल्याला वर्षभर ऊर्जा मिळत राहते.

यासाठीच माझं तुम्हाला सांगणं आहे की, तुमची परसबाग असेल तर हे बहुगुणी झाड नक्की लावा.

## मनाच्या कप्प्यातली एक आठवण

**रो. माधुरी किरपेकर**

मध्यंतरी पेपरमध्ये कपिल देवच्या अॅन्जिओप्लास्टीची बातमी वाचली आणि मन एकदम पंचवीसतीस वर्षं मागं गेलं.

साधारण १९९२-९३ सालातली गोष्ट असेल...

आम्ही त्या वेळी दिल्लीला राहत होतो. माझी धाकटी मुलगी अदिती अगदी लहान होती. नुकतीच बोलायला लागली होती... पण तिला क्रिकेटची मॅच बघायला खूप आवडायचं. त्या वेळी अनिल कुंबळे चश्मा लावून खेळायचा... त्यामुळं ती त्याला लगेच ओळखायची. कपिल देवसुद्धा तिला लगेच ओळखू यायचा.

हे सगळं आठवायचं कारण म्हणजे त्याच सुमारास माझा नवरा उदय कामासाठी पुण्याला गेला होता आणि हॉटेल ‘ब्लू डायमंड’मध्ये राहिला होता... तेव्हा पुण्यात भारत आणि इंग्लंड की साऊथ-आफ्रिका (नक्की आठवत नाही) यांची क्रिकेट मॅच झाली होती आणि भारत जिंकला होता. भारतीय क्रिकेटची टीमही ‘ब्लू डायमंड’मध्येच राहायला होती. उदयचा एक मित्र हा सचिन तेंडुलकरच्या मोठ्या भावाचाही मित्र. त्याला चांगलं माहीत होतं की, उदय किती क्रिकेटवेडा आहे... त्यामुळं त्यानं तिथंच असलेल्या भारतीय क्रिकेट टीमबरोबर उदयची ओळख करून दिली. सचिन तेंडुलकरशी उदयच्या भरपूर गप्पाही झाल्या.

दुसऱ्या दिवशी दोन्ही क्रिकेट टीम्स आणि उदय एकाच विमानानं दिल्लीला यायला निघाले. त्या वेळेस मोबाईल नव्हतेच आणि लँडलाईनही कमीच होते... त्यामुळं उदयनं दिल्लीतला आमचा मित्र संजय गोखले याला फोन करून तो संध्याकाळी दिल्लीत येत असल्याचा निरोप दिला. दोनच दिवसांपूर्वी संजयनं नवीन गाडी घेतली होती. तो संध्याकाळी घरी आला आणि मला म्हणाला, ‘चलऽ आपण एअरपोर्टवर जाऊन उदयला सरप्राईज देऊ आणि नवीन गाडीही दाखवू.’ म्हणून त्याच्या नवीन गाडीनं मी, संजय, त्याच्या दोन्ही मुली, माझ्या सासूबाई आणि अक्षय, अदिती असे सगळे एअरपोर्टला गेलो. त्या वेळी एअरपोर्टवर एवढी कडक सिक्युरिटी नसायची. दिल्लीचं डोमेस्टिक एअरपोर्टही लहानच होतं. आम्ही सर्व जण अरायव्हल गेटशी थांबलो होतो. थोड्याच वेळात उदय बाहेर आला. आम्हा सगळ्यांना बघून त्याला आश्चर्य तर वाटलंच... तेवढ्यात तो म्हणाला ‘थांबाऽ मी तुम्हाला कुणाचीतरी ओळख करून देतो.’ तो असं म्हणत असतानाच सचिन त्याच्या मागून आला. उदय त्याला म्हणाला, ‘बघऽ तुझं अभिनंदन करायला माझी आई आणि माझी फॅमिली आली आहे.’

उदयनं असं म्हणता क्षणी सचिन माझ्या सासूबाईच्या पाया पडला. त्यानं असं करताच पूर्ण टीमच त्यांच्यापुढं वाकली. सासूबाईंना तर कोण आनंद झाला....

त्याही फार क्रिकेटप्रेमी होत्या. सुनील गावस्कर खेळायला लागला की त्या देव पाण्यात घालून बसायच्या. माझी मुलगी अदिती माझ्या कडेवर होती. हे सगळं बघून ती सारखी विचारत होती, ‘कपिल देव कुठे आहे?’ कपिल देवनं ते ऐकलं आणि मला विचारलं, ‘हू इज आस्किंग फॉर मी?’

मी म्हटलं ‘धीस यंग लेडी.’

त्यानं लगेच अदितीला माझ्याकडून स्वतःच्या कडेवर घेतलं आणि म्हणाला ‘ये देखोऽ कपिल देव।’

आणि तिला कडेवर घेऊन सगळ्यांना सांगत सुटला ‘देखो देखोऽ ये गुडिया सिर्फ मेरे लिए पूछ रही है...’

काय तो क्षण होता आता वाटतं... तेव्हा मोबाईल कॅमेरा वगैरे असता तर किती संस्मरणीय फोटो आला असता....

असोऽ आता फक्त आठवणी आहेत. गंमत म्हणजे आम्ही गेलो होतो उदयला सरप्राईज द्यायला... पण त्यानंच आम्हाला मस्त सरप्राईज दिलं.

अशी फोटोत बंदिस्त न करता आलेली पण मनाच्या कप्प्यात कायमस्वरूपी असलेली ही आठवण....

## दिवाळी रांगोळी

**दिवाळीत आपल्या क्लबच्या ॲन्सनी काढलेल्या सुरेख रांगोळ्या.**








## मृग नक्षत्र


ऐकण्यासाठी क्लीक करा...

**रो. डॉ. सुभाष देशपांडे**

मृग नक्षत्र हे पृथ्वीवरून कुठुनही दिसणारं नक्षत्र आहे. याचं कारण ते विषुववृत्तीय भागात वसलेलं आहे. ते अगदी सहज ओळखू येतं... कारण त्याच्यातले सर्व तारे ठळक आहेत. त्याचप्रमाणे नक्षत्राचा आकारसुद्धा वैशिष्ट्यपूर्ण आहे. खगोलशास्त्रानुसार मृग नक्षत्र पाश्चिमात्य खगोलशास्त्रातल्या ‘ओरायन’ या तारकासमूहाचा एक भाग आहे.

भारतीय दंतकथेनुसार ब्रम्हदेवाचा मुलगा प्रजापती स्वतःच्या मुलीच्या, रोहिणीच्या प्रेमात पडला आणि हरणाचं रूप धारण करून तो तिचा पाठलाग करायला लागला. या वर्तनाबद्दल शिक्षा म्हणून त्याला मारण्याकरता देवांनी व्याधाला धाडलं. मृग उत्तरेला पळत असताना व्याधानं त्याला बाण मारले.

या नक्षत्रात पुढं दोन आणि पाठीमागं दोन असे चौकोनी आकारात चार तारे आहेत. हे तारे म्हणजे मृगाचे पुढचे दोन आणि पाठीमागचे दोन पाय समजले जातात. पुढच्या दोन पायांमध्ये अस्पष्ट आणि लहान असा एक तारकापुंज आहे. ते या मृगाचं शीर. याचं तोंड उत्तरेकडं असतं. मृगाच्या चार पायांमध्ये तीन ठळक तारे सरळ रेषेत आढळतात. हाच तो व्याधानं सोडलेला बाण. हा बाण पुढचा डावा पाय आणि मागचा डावा पाय यांच्या मधून हरणाच्या शरीरात घुसलेला आहे. बाणाच्या सरळ रेषेत खाली बघितलं तर व्याधाचा




ठळक तारा आढळतो. मृगाच्या मागच्या पायांमध्ये आणि बाणाच्या खालच्या भागात तीनचार तारकांचा पुंज दिसतो. हीच त्या मृगाची शेपूट होय. मृग नक्षत्राच्या पुढच्या डाव्या पायाचा तारा 'बिटलजूस' होय. हा तारा रेड जायंट आहे. ताऱ्यांच्या आयुष्याच्या शेवटी अशा प्रकारचे तारे तयार होतात. या ताऱ्यामधलं इंधन संपत आल्यामुळं याचा मोठा स्फोट होऊन त्याचं रूपांतर 'सुपरनोव्हा'मध्ये होईल. खगोलशास्त्राज्ञांचं लक्ष या ताऱ्याकडं लागलेलं आहे... कारण हा स्फोट केव्हा होईल हे सांगता येत नाही आणि स्फोट झाल्यावर तो आपल्याला सहाशे चोवीस वर्षांनी दिसेल कारण 'बिटलजूस' तारा पृथ्वीपासून सहाशे चोवीस प्रकाशवर्षं दूर आहे. जर सहाशे चोवीस वर्षांपूर्वी हा स्फोट होऊन गेलेला असेल तर तो आजच दिसेल. पुढचा उजवा पाय म्हणजे 'बेलाट्रिक्स' तारा होय. हा एक ब्लू जायंट आहे. तो पृथ्वीपासून दोनशे पंचेचाळीस प्रकाशवर्षं दूर आहे. मागचा डावा पाय म्हणजे 'सैफ' हा तारा. हा पृथ्वीपासून सहाशे पन्नास प्रकाशवर्षं दूर आहे. 'रिगेल' हा तारा मृगाचा मागचा उजवा पाय होय. तो ब्लू सुपर जायंट असून अतिशय तेजस्वी आहे. बाणाच्या टोकाचा तारा 'मिनटाका' होय. खरोखरच तो दोन ताऱ्यांचा संच आहे. तो पृथ्वीपासून साधारणपणे नऊशे सोळा प्रकाशवर्षं दूर आहे. 'अलनिलाम' तारा बाणातला मधला तारा आहे. हा तारा पृथ्वीपासून एक हजार तीनशे बेचाळीस प्रकाशवर्षं दूर आहे. 'अलनिटक' तारा बाणाचा मागचा भाग होय. हा तीन ताऱ्यांचा संच आहे. हा संच पृथ्वीपासून आठशे प्रकाशवर्षं दूर आहे.

मृगाचं शेपूट विविध ताऱ्यांचं आहे ज्यांना 'ट्रॅपिझिअम' असं म्हणतात. त्याचप्रमाणे त्यामध्ये 'ओरायन नेब्यूला'चाही समावेश आहे. 'ओरायन नेब्यूला' हा एका मोठ्या ताऱ्याच्या विस्फोटापासून तयार झालेला आहे. या स्फोटाला 'सुपरनोव्हा' असं संबोधतात. हा नेब्यूला धूलिकणांच्या ढगांपासून तयार झालेला आहे... ज्यामध्ये नवीन तारे तयार होतात. सूर्यमाला कशी तयार झाली असावी याचा अभ्यास 'ओरायन नेब्यूला'वरून करता येतो. हा नेब्यूला पृथ्वीपासून दीड हजार प्रकाशवर्षं दूर आहे. मृगाच्या बाणापासून खाली सरळ रेषेत व्याधाचा ठळक तारा दिसतो. हा तारा अवकाशातला सर्वांत तेजस्वी तारा आहे. हा तारा एकमेकांभोवती फिरणाऱ्या दोन ताऱ्यांचा संच आहे. तो पृथ्वीपासून आठ पूर्णांक साठ शतांश प्रकाशवर्षं दूर आहे. इंग्लीशमध्ये त्याला 'सायरस' असं म्हणतात. हा सूर्यानंतर पृथ्वीला सगळ्यांत जवळचा तारा आहे. मृगाचं शीर तीन ताऱ्यांचं तयार झालेलं आहे. सगळ्यांत मोठा तारा 'मीसा' पृथ्वीपासून अकराशे प्रकाशवर्षं दूर आहे. असं आहे हे सर्वांत सुंदर आणि तेजस्वी मृगशीर्ष नक्षत्र.

या वर्णनावरून आपल्या लक्षात आलं असेलच की, जरी आकाशातल्या चांदण्या आपल्याला एकाच पातळीवर दिसत असल्या तरी त्या निरनिराळ्या अंतरांवर असतात. आपल्याला अवकाशाच्या खोलीचं आकलन होत नाही.


- **सभासदांचा सहभाग वाढावा हा हेतू**
- **सभासदांच्या कलागुणांना वाव**
- **चित्रकला, फोटोग्राफी, कथा, लेख, कविता**
- **व्यक्तिगत, कौटुंबिक, व्यावसायिक गवसणी**


**कलाकारी**

**तुमचा लेख आवर्जून द्या....**
**समन्वयक**
**आनंद कुलकर्णी / यामिनी पोंक्षे**

# द अर्ग्युमेंटेटिव्ह इंडिअन

रो. पीपी गोविंदराव पटवर्धन

ऐकण्यासाठी क्लीक करा...




सर्वसाधारणपणे नवीन पुस्तकाचा परिचय लिहिला जातो... पण मी नुकतंच वाचलेलं पुस्तक दहापेक्षा जास्त वर्षांपूर्वी प्रसिद्ध झालेलं आहे. बहुतेक लोकांनी वाचलेलं नसेल असा माझा अंदाज आहे आणि रो. योगेद्र नातू यांनी आग्रह धरला म्हणून हा एक प्रयत्न...

लेखकाबद्दल थोडंसं...

अमर्त्य सेन यांना नोबेल पारितोषिक मिळालं आहे हे सर्वांना माहीत आहे. अनेक सामाजिक समस्यांवर त्यांनी काही सिद्धान्त मांडलेले आहेत. जसे–

(१) सामाजिक निवडीचा सिद्धान्त

(२) दारिद्र्याचे निर्देशांक

(३) कल्याणाचे निर्देशांक आणि

(४) दुष्काळाचे विश्लेषण

त्याला कल्याणकारी अर्थशास्त्र असं म्हटलं जातं. समाजाच्या विविध घटकांवर होणारे आर्थिक धोरणांचे परिणाम हितावह आहेत की नाहीत याचं शास्त्रशुद्ध मूल्यमापन करणं हे कल्याणकारी अर्थशास्त्राचं उद्दिष्ट आहे.

सेन हे अर्थशास्त्रज्ञ असले तरी त्यांचं एक पुस्तक वेगळ्या विषयावर आहे ज्याचं नाव आहे 'द अर्ग्युमेंटेटिव्ह इंडिअन'... (The Argumentative Indian...) जगात छोट्यामोठ्या कारणानं दोन गट एकमेकांविरुद्ध उभे ठाकल्यानं यादवी माजलेली पाहायला मिळते... मात्र भारतात अठरा पगड जातीचे लोक, पंथ, धर्म अनेक शतकं एकत्र नांदत आहेत हे एक आश्चर्य आहे. असं म्हणतात की, प्रत्येक भारतीय तत्त्वज्ञ असतो. त्याचं कारण 'वादे वादे जायते तत्त्वबोधः' ही आपली परंपरा आहे... वादविवाद आणि प्रतिवाद यांमुळं भारतीय संस्कृती विकसित आणि प्रगल्भ झाली आहे. वैदिक काळापासून ही परंपरा आजपर्यंत चालू आहे. याची अनेक उदाहरणं लेखकानं दिली आहेत. भारतीय इतिहासात निर्माण झालेले, बाहेरून येऊनही मिसळून गेलेले वेगवेगळे विचारप्रवाह समजल्याशिवाय भारताची खरी ओळख होऊ शकत नाही.

लेखक म्हणतात 'Does the richness of the tradition of argument make much difference to Subcontinental lives today? I would argue it does, and in great many different ways... It has helped to make heterodoxy the natural state of affairs in India.' '...even though the Indian democracy remains imperfect... the ways and means of overcoming those faults can draw powerfully on the argumentational tradition.'

ब्रिटिश सत्तेमुळं भारतात लोकशाही आली हे अर्धसत्य आहे. भारतीय इतिहासाकडं पाश्चात्य दृष्टीकोनातून विशेषतः ब्रिटिश दृष्टीकोनातून जे बघतात त्यांनी असा गैरसमज पसरवलेला आहे. भारतीय संस्कृती विवादप्रिय आहे. देवाचं अस्तित्व न मांडणारे चार्वाक, लोकायत यांना 'तत्त्व दर्शने' म्हणून स्थान दिलं गेलं, गौतम बुद्ध यांना विष्णूचा अवतार मानलं गेलं. ही सहिष्णुता हेच भारतीय संस्कृतीचं वैशिष्ट्य आणि बलस्थान आहे. संवाद आणि चर्चा संस्कृतीमुळे धातुशास्त्र, खगोलशास्त्र, अर्थशास्त्र, गणित, तत्त्वज्ञान, भाषा आणि व्याकरण यांत सखोल अभ्यास झाला आणि मूलभूत विचार मांडले गेले. भारतानं विविध क्षेत्रांत गरुडझेप घेतली होती तरी त्याचं उचित श्रेय इतिहासकारांनी दिलेलं नाही. विज्ञान, विचारस्वातंत्र्य आणि सहिष्णुता ही तत्त्वं पाश्चात्यांनी भारतात आणली हे ठसवलं जातं... पण ते चुकीचं आहे. परकीय आक्रमणांमुळं आणि पारतंत्र्यामुळं वादपरंपरा खंडित झाली. गेल्या शतकात स्वतंत्र

झालेल्या अनेक देशांत लोकशाही टिकली नाही... पण भारतात ती स्थिरावली. बहुविध विचारप्रणाली, परमत सहिष्णुता आणि वादविवाद परंपरा ही कारणं त्यामागं आहेत.

नाव जरी 'द अर्ग्युमेंटेटिव्ह इंडिअन' असलं तरी पुस्तकात भारतीय संस्कृती, इतिहास, आर्थिक आणि सामाजिक प्रश्न यांवरील लेख आहेत. विविध अंगांनी विषय मांडले आहेत. सर्व लेख विद्वत्तापूर्ण आहेत. लेखक 'अर्ग्युमेंटेटिव्ह इंडिअन' आहे हे मात्र नक्की सिद्ध होतं.

बहुतेक बंगाली भद्र लोकांना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाबद्दल आकस असतो. तसंच बौद्ध आणि मुस्लीम शास्ते (विशेषतः अकबर) आणि त्यांनी दिलेलं योगदान यांबद्दल विशेष आत्मीयता असते. गेल्या काही दशकांत भारतीय बहुविध संस्कृतीला हिंदू विचारांत बंदिस्त करण्याचा प्रयत्न चालवला आहे ते घातक आहे असं त्यांचं आग्रही मत आहे. लेखक बंगाली आहे. त्यांच्या लेखांतून हेच विचार दिसून येतात.

लेखकानं वेगवेगळ्या वेळी आणि वेगवेगळ्या प्रसंगी दिलेली व्याख्यानं आणि लिहिलेले लेख यांचं हे संकलन आहे... त्यामुळं अनेक वेळा पुनरुक्ती झाली आहे. अगदी 'शशी थरूर'इतकी नाही तरी मला भाषा जरा जड वाटली. सावकाश वाचावं लागलं.

## मला परीक्षण लिहायला आवडतं...

**ॲन प्रियदर्शिनी अंबिके**

मला अशा कलाकृतीबद्दल लिहायला आवडतं ज्या प्रसिद्धीच्या मुख्य प्रवाहापासून थोड्या दुर्लक्षित झाल्या आहेत. कदाचित त्यात अगदी नवखे कलाकार असतील किंवा प्रायोगिक तत्त्वावर घडल्या असतील किंवा अन्य काही कारणांनी पण ज्या कलाकृती चांगल्या आहेत त्याला दाद तर मिळायलाच हवी.

याला आणखी दोन कारणं आहेत; पहिलं म्हणजे आपण जे काही छान पाहिलंय, अनुभवलंय, त्यातून मिळणारा आनंद आपल्या मित्रमैत्रिणींनासुद्धा मिळायला हवा असं मला वाटतं आणि दुसरं कारण म्हणजे कुठल्याही लेखकाला, कवीला, नटाला, चित्रकाराला किंवा अन्य कलाकाराला त्याच्या कलेचा प्रसार व्हावा, त्याला दाद मिळावी असं वाटत असतं. मीसुद्धा एक अगदी लिंबूटिंबू कलाकार आहे आणि म्हणूनही मला वाटतं की अशा चांगल्या कलाकृतींचा प्रसार व्हायलाच हवा.

आज मी दोन शॉर्ट फिल्म्सबद्दल लिहिणार आहे.




पहिली आहे हॉटस्टार वरची 'आदत'. ही एक अत्यंत क्यूट अशी लव्हस्टोरी आहे. यांतले कलाकार अगदी नवीन आहेत.

फिल्म सुरू झाल्यावर दोन मिनिटांत आपल्या लक्षात येतं की, या जोडप्याचं लग्न होऊन काही महिनेच झालेले आहेत पण त्या दोघांत काहीतरी बिनसलंय कारण नवरोजी सारखा सॉरी म्हणतोय आणि राणीसरकार चिडलेल्या आहेत.

'डॉक्टरकडे जायला तू का नाही म्हणतोस? तुला प्रॉब्लेम सुटायला नकोय का?' असं ती नवऱ्याला जेव्हा विचारते तेव्हा आपल्याला अंदाज येतो की यांचा प्रॉब्लेम काय असावा.

चिडचिड करत बायको ऑफिसला जाते आणि मैत्रिणीबरोबर परत याच विषयावर चर्चा होते मग मैत्रीणसुद्धा एक डॉक्टर सुचवते. तेवढ्यात नवऱ्याचा फोन येतो आणि एक दिवसासाठी तो दिल्लीला निघाल्याचं तिला सांगतो. तिला बरंच वाटतं. निदान आजचा दिवस तरी भांडण नाही, रात्र शांततेत जाईल म्हणून आनंदात ती घरी येते. रात्री बेडवर आडवी होते पण नवऱ्याची आठवण येऊ लागते.

आता काय करायचं? म्हणून ती नवऱ्याला फोन करते तर साहेब गाढ झोपेत असतात.

पुढं काय होतं? काय असतो त्यांचा प्रॉब्लेम? आपला अंदाज खरा ठरतो का? शेवटी त्यांचा प्रॉब्लेम सुटतो का?

या प्रश्नांची उत्तरं हवी असतील तर ही दहा मिनिटांची गोड फिल्म ‘आदत’ नक्की बघा.

दुसऱ्या फिल्ममध्ये सर्व प्रसिद्ध आणि ओळखीचे चेहरे आहेत. ‘क्राईम पेट्रोल’चा अनूप सोनी ‘विनय’ या मुख्य भूमिकेत आहे. त्याची बायको जुही बब्बर (राज बब्बरची लेक), अनुपम खेर आणि दिव्या दत्ता अशी तगडी स्टारकास्ट असलेली ही फिल्म ‘लॉकडाउन’च्या काळात तयार झालेली आहे. अत्यंत इंटेन्स आणि अस्वस्थ करून सोडणारी, यू ट्यूबवर असलेली, फाल्गुनी ठाकूर दिग्दर्शित शॉर्ट फिल्म...




‘द रिलेशनशिप मॅनेजर’

विनय (अनूप सोनी) बड्याबड्या लोकांच्या आर्थिक गुंतवणुकी सांभाळणारा रिलेशनशिप मॅनेजर आहे. मोठमोठे फिल्मस्टार, उद्योगपती वगैरे त्याचे क्लाएंट्स आहेत.

लॉकडाउन असल्यामुळं सध्या तो फोनवरून आपलं काम करत आहे.

अशाच एका उद्योगपती क्लाएंटशी बोलताना त्याला जाणवतं की, या घरात काहीतरी घडू नये ते घडत आहे. बहुधा पत्नीला मारहाण होत आहे.

बडी मंडळी आणि त्यात लॉकडाउन... नक्की काय आहे हे प्रकरण आणि कितपत पुढे गेलं असेल, आपण त्यात काय मदत करू शकतो या विचारांनी तो अस्वस्थ होतो. मग त्याला एक युक्ती सुचते आणि त्या घरातल्या पीडित स्त्रीशी संवाद साधण्यात तो यशस्वी होतो.

पण नुसता संवाद काय कामाचा?

विनय त्यातून खूप छान मार्ग काढतो आणि त्या स्त्रीला सबल करतो.

विषय फार वेगळा नसला तरी खूप महत्त्वाचा आहे आणि तो इतक्या वेगळ्या प्रकारे हाताळला गेला आहे की, आपण त्यात गुंतून जातो.

विनयसारखे रिलेशनशिप मॅनेजर मोठ्या संख्येनं जन्माला यायला हवेत असं आपल्याला वाटत राहतं.

अनूप सोनीला आपण क्राईम पेट्रोलमध्ये चालतचालत बोलताना इतक्यांदा पाहिलंय की सुरुवातीला तेच आठवत राहतं पण नंतर त्याचा आणि दिव्या दत्ताचा जबरदस्त अभिनय आपल्याला या अठरा मिनिटांच्या फिल्ममध्ये दोन तासांच्या पूर्ण सिनेमाचा अनुभव देऊन जातो.

नक्की बघा गोड प्रेमाची ‘आदत’ आणि विचार करायला लावणारा ‘द रिलेशनशिप मॅनेजर...’


- **सभासदांचा वेगवेगळ्या विषयांवरचे दृष्टिकोन मांडण्याची जागा...**
- **हलकंफुलकं लेखन हवं**
- **पुस्तंक, नाटक, चित्रपट, मालिका, वेबसिरीज**
- **राजकारण, समाजकारण, चालू घडामोडी**

**तुमचा लेख आवर्जून द्या...**
**समन्वयक**
**योगेंद्र नातू / अभिजित देशपांडे**

**दृष्टिकोन**

***Thank you all of you!!***

### *DIWALI – 2020 Grocery Distribution*

| Sr. No. | Name | Amount in Rupees |
|---|---|---|
| 1 | Rtn. PP Vipin Gujarathi | 21,000 |
| 2 | Rtn. PP Vinod Agarwal | 10,000 |
| 3 | Rtn. PN Sanjeev Ogale | 5,000 |
| 4 | Rtn. President Sudarshan Natu | 10,000 |
| 5 | Rtn. Niranjan Thangaonkar | 5,500 |
| 6 | Rtn. PP Sonal Patwardhan | 1,100 |
| 7 | Rtn. PP Sudhir Waghmare | 5,500 |
| 8 | Ann Shobhatai Kudale | 11,000 |
| 9 | Rtn. Ajit Shelar | 1,500 |
| 10 | Rtn. Ajit Phadke | 1,000 |
| 11 | Rtn. Shweta Karandikar | 5,500 |
| 12 | Rtn. Raghavendra Ponkshe | 5,000 |
| 13 | Rtn. Datta Deodhar | 5,000 |
| 14 | Rtn. IPP Abhijit Joag | 5,500 |
| 15 | Rtn. PP Sandip Vilekar | 2,000 |
| 16 | Rtn. Ravindra Prabhune | 3,300 |
| 17 | Rtn. Abhijit Deshpande | 2,200 |
| 18 | Rtn. Nitin Pathak | 3,000 |
| 19 | Rtn. Madhuri Kirpekar | 100 sarees |
| 20 | Mr. Dhanesh Chitrav | 15 blankets |

### *Donations received for AIDS Rehabilitation Project*

| | |
|---|---|
| Rtn. PP Sham Kulkarni and Ann Vinita Kulkarni | Rs. 10,000/- |
| Rtn. Arun Joshi and Ann Usha Joshi | Rs. 5000/- |

शनिवारी २१ नोव्हेंबरला पुणे रनडाऊनर्स या संस्थेनं पुणे कऱ्हाड पुणे अशी तीनशे किलोमीटर्सची सायकलवारी आयोजित केली होती त्यामध्ये रो. योगेंद्र नातू यांचा धाकटा मुलगा मंगेश यानं भाग घेतला आणि हे अंतर त्यानं अठरा तासात पूर्ण केलं.

वेळोवेळी रो. उद्धव गोडबोले यांनी केलेल्या मार्गदर्शनामुळं हे शक्य झालं.

विशेष म्हणजे फारसा सराव न करता साध्या सायकलवर त्यानं हे अंतर पार केलं अशी भावना रो. योगेंद्र नातू यांनी व्यक्त केली.




व्हिडिओ इथे पाहा...

## विशेष

- शुभेच्छा
- स्मृती
- गवसणी
- या महिन्यात मागच्या वर्षांत...

तुमचा लेख आवर्जून द्या...
समन्वयक
श्वेता करंदीकर

## टीम बुलेटिन

### सदरं

- मुखपृष्ठ ..........................श्वेता.............. विधानं/ कोट्स
- संपादकीय/ अध्यक्षीय........योगेश /सुदर्शन
- रोटरी..........................योगेंद्र / अभिजित............... रोटरी मंच/RI
- डिस्ट्रिक कनेक्ट...........योगेंद्र / अभिजित........ डिस्ट्रिक घडामोडी
- क्लबकारी.........................आनंद / यामिनी..........क्लब घडामोडी
- कलाकारी.........................आनंद / यामिनी..........सभासद गुणदर्शन
- दृष्टीकोन.......................योगेंद्र / अभिजित..........पुस्तक, चित्रपट इ.
- विशेष............................श्वेता....................शुभेच्छा, स्मृती

- क्रिएटिव्ह असिस्टन्स आणि कोऑर्डिनेशन..........टीम सहयोगी